महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्र. १४४७(२)/२०२२/वीस** **दिनांक:- ११ डिसेंबर, २०२३**

## प्रसिध्दीपत्रक

**विषय :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२२ मुलाखतीबाबत. (तिसरा टप्पा)**

**संदर्भ :-** (१) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
(२) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १० नोव्हेंबर,२०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
(३) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ६ डिसेंबर, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
(४) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

प्रस्तुत परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीस अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांचा **तिसऱ्या टप्प्यातील** मुलाखत कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्यात नवी मुंबई व औरंगाबाद केंद्रावरील दिनांक १९ ते २२ डिसेंबर, २०२३ च्या मुलाखत कार्यक्रमाचा समावेश आहे. या केंद्रांवरील दिनांक १९ ते २२ डिसेंबर, २०२३ च्या कार्यक्रमाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | दिनांक | मुलाखत क्रमांक | केंद्र व मुलाखत ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | दिनांक १९ ते २१, डिसेंबर, २०२३ | मु.क्र. ९६५ ते १०२७ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग<br>त्रिशुल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर,३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११,<br>सीबीडी बेलापूर, नवी मुंबई -४००६१४. |
| २ | दिनांक १९ ते २२, डिसेंबर, २०२३ | मु.क्र. १२४९ ते १३९२ | छत्रपती संभाजीनगर –<br>सुभेदारी रेस्ट हाऊस, शासकीय कला व विज्ञान महाविद्यालयाजवळ, छत्रपती संभाजी नगर – ४३१ ००१. |

सदर उमेदवारांना मुलाखत पत्रे पाठविण्यात येत आहेत याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२. प्रस्तुत परीक्षेच्या मुलाखतीचा कार्यक्रम प्रथम दिनांक १० नोव्हेंबर, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आला होता. तथापि, त्यात प्रशासकीय कारणास्तव काही प्रमाणात बदल होत असल्यामुळे मुलाखतीस अर्हताप्राप्त ठरलेल्या उर्वरित उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम प्रसिध्दिपत्रकाद्वारे टप्प्याटप्प्याने प्रसिध्द करण्यात येत आहे. दिनांक १२ डिसेंबर, २०२३ ते १५ डिसेंबर, २०२३ या कालावधीत आयोगाच्या नवी मुंबई येथील कार्यालयात सदर परीक्षेच्या मुलाखती आयोजित करण्यात आलेल्या नाहीत, याची संबंधीत उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव (राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.